# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- /०९/२०१८

## " मुलगी झाली म्हणुन मुलीचा खुन करणाऱ्या बापास आजन्म सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे अडयाळ अंतर्गत मौजा गोसे (बु.) येथिल राहणारा ईसम डाकराम पंढरी घोरमोडे याने पत्नीस मुलगा न होता मुलगी झाली म्हणुन स्वतःचे १८ महिण्याच्या मुलीचा गळा दाबुन खुन केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक १५.०९.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपीस आजन्म सश्रम कारावास व ६००० रुपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहीती अशी की, सौ. मनिषा डाकराम घोरमोडे हिचे जाती रिवाजा प्रमाणे सन २०१४ ला डाकराम पंढरी घोरमोडे रा. गोसे (बु.) ता. पवनी जिल्हा भंडारा यांचे सोबत लग्न झाले तेव्हा पासुन सौ. मनिषा हि पती कडे सासु, सासरे, भासरा असे एकत्र कुटूंबांने राहत होते. मनिषा हि पती कडुन नेहमीच त्रास सहन करीत होती. सौ. मनिषा हिस पती पासुन दिवस राहीले व प्रसुती करीता दोन महिण्या अगोदर पासुन आपले वडीलाकडे ग्राम बोरडा ता. रामटेक जिल्हा नागपुर येथे गेली सौ. मनिषा हिस दिनांक १५.०६.२०१५ ला प्रसुती होवुन मुलगी झाली. मुलगी झाल्याची बातमी पती डाकराम घोरमोडे यास देण्यात आली परंतु डाकराम यास मुलगी झाल्याने आंनद न होता परिवारात नाराजी व्यक्त करून मुलीस व पत्नीस पाहण्यास सुध्दा गेले नाहीत व मुलगी हि १८ महिण्याची होवुन सुध्दा पती डाकराम याने पत्नी व मुलीस स्वतःचे घरी आनले नाही. परिवारातील पुढारी व्यक्तीना मध्यस्ती करून मुलगी व पत्नी सौ. मनिषा यांना १८ महिण्या नंतर दिनांक ९.०८.२०१६ रोजी स्वतःचे घरी आनले परंतु मुलगा न होता मुलगी झाली हे राग मनात ठेवुन पोटच्या मुली सोबत क्रुरपणे वागणुकी देवुन मुलीचा व पत्नी सौ. मनिषा हिचा नेहमीच तिरस्कार करून झगडा भांडण करीत असे. दिनांक १.०९.२०१६ रोजी सकाळी ८.०० वा. सुमारास सौ. मनिषा हि पाणी भरण्याकरीता नळावर गुंड घेवुन गेली तेव्हा मुलगी हि घरी पलंगावर झोपली होती व पती डाकराम घोरमोडे घरी होता काही वेळाने नळावरून पाणी घेवनु घरी परत आली असता पती डाकराम पंढरी घोरमोडे हा मुलगी हिचा गळा दाबतांना दिसला म्हणुन हातातील गुंड ठेवुन धावत मुलीकडे गेली व मुलीला बाहेर घेवन आली मुलगी बोलत नव्हती तीचा अंग थंडगावर होवुन तिची जिभ बाहेर आल्या सारखी दिसली त्यावरून पती, भासरा यांनी मुलीस पवनी येथे उपचाराकरीता नेत असता त्यांचे सोबत जबरीने सौ. मनिषा हि गेली परंतु पती डाकराम याने पत्नी सौ. मनिषा हिस कोणत्याही प्रकारे माहिती न देता सौ. मनिषा हिस दवाखाण्यात ठेवुन मुलगी हिस गावी गोस(बु.) येथे परत घेवुन आले मुलगी हि मरण पावल्याची शंका आल्याने त्याबाबत माहिती आपले आई-वडील यांना मोबाईल फोनद्वारे माहिती दिली. काही वेळाने मनिषा हि दुसऱ्याचे मोटार सायकलने गावी गोस(बु.) येथे आली परंतु मृतक मुलगी हिचे त्याच दिवशी अंतिम संस्कार केले सौ. मनिषा हिचे मनावर मोठा आघात झाल्याने

प्रकृती अस्तीर झाली. याबाबतची तक्रार सौ. मनिषा हिने पोलीस ठाणे अडयाळ येथे दिनांक ३.९.२०१६ रोजी येथे पती डाकराम पंढरी घोरमोडे याचे विरूध्द कार्यवाही करण्याकरीता तोंडी तक्रार दिली. सदर तक्रारवरून मर्ग नोंद करून घटणे बाबत गांभिर्याने दखल घेवुन मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात तत्कालीन ठाणेदार सपोनि अजाबराव नेवारे यांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान मृतक वय १८ महिणे हिचे प्रेत जमिनीतुन उखरून प्रेताचा वैद्यकीय अधिकारी यांचे कडुन अहवाल मागविण्यात आला सदर अहवाल मुलीचा गळा आवळुन मरण पावल्याचे सादर केले. डाकराम पंढरी घोरमोडे याने मुलगा न होता मुलगी झाली अशी द्वेश भावणा मनात ठेवुन स्वतःचे १८ महिण्याचे मुलीचा गळा आवळुन खुन केला असे निष्पन्न झाले वरून आरोपी डाकराम घोरमोडे यांचे विरूध्द अपराध क्रमांक ५६/१६ कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक अजाबराव नेवारे यांनी करुन गुन्हयातील आरोपी डाकराम पंढरी घोरमोडे, वय ३१ वर्ष रा. गोसे (बु.) ता. पवनी जिल्हा भंडारा यास तात्काळ कायदेशिर अटक करून गुन्हयात साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने आरोपपत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ४/१७ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता, सत्र न्यायालय भंडारा** यांनी गुन्हयातील साक्षपुरावा योग्य प्रकारे न्यायालयात सादर करून शासना तर्फे बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक १५.०९.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी डाकराम पंढरी घोरमोडे, वय ३१ वर्ष** याचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०२ भादवि मध्ये आजन्म सश्रम कारावास व व ६००० रूपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली**. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, सुरेश ढोबळे, ठाणेदार पोलीस ठाणे अडयाळ यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार काशिराम मस्के/६७६ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.